|| श्री देव अंजनेश्वर प्रसन्न ||

बारा गावांचे स्वयंभू जागृत देवस्थान

# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी - ४१६ ७०२


(रजि. नं. आर.टी.एन./अ/६७) नोंदणी वर्ष - १९५२

## वार्षिक अहवाल

(वर्ष २०१७-१८)









Scanned by CamScanner





Scanned by CamScanner

|| श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ||



बारा गावचे

जागृत देवस्थान



# श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

( रजि. नंबर : आरटीएन (ए) ६७ )

# निमंत्रण

स. न. वि. वि.

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानचा

## कार्तिकोत्सव

मिति कार्तिक शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध पौर्णिमा **रविवार दिनांक १८ नोव्हेंबर २०१८ ते गुरूवार दि. २२ नोव्हेंबर २०१८** असा पाच दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सव काळातील पाच दिवसामध्ये आरती, भोवती, कीर्तन हे प्रथेप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. तरी आपण सर्वांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व यथाशक्ती देणगी पाठवावी ही विनंती.

आपले नम्र,

**विश्वस्त, श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**

- देणगी पाठविण्याचा पत्ता -

**विश्वस्त, श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**

मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी. पिन ४१६ ७०२

मोबा. ९२८४३८८७३१ / ९८२३२७७३२६ / ७०३८७८५००१

देणगी पाठवताना मनिऑर्डर कुपनवर सुवाच्च अक्षरात मराठीतच पत्ता लिहावा.
रु.५०/- पुढील देणगीदारांनाच पोस्टाने प्रसाद पाठविला जाईल.

Scanned by CamScanner

# -: कार्तिकोत्सवातील कार्यक्रम :-

- **रविवार दि.१८-११-२०१८** रोजी सकाळी ८.०० वाजता श्रीदेवावर 'लघुरुद्र अभिषेक' व पंचोपचार पूजा. रात्रौ ठीक ९-०० वाजता धुपारती, आरती, भोवती व श्री.ह.भ.प. दत्तात्रय श्री. रानडे, राजापूर यांचे कीर्तन. कीर्तनाचा विषय – गणेश वंदना (पूर्वरंग), बालभक्त बल्लाळ (आख्यान).

- **सोमवार दि.१९-११-२०१८** रोजी रात्रौ ठीक ८.०० वाजता तुलसी विवाह समारंभ, त्यानंतर आरती, भोवती झाल्यानंतर श्री. रानडे यांचे कीर्तनाचे द्वितीय पुष्प- कीर्तनाचा विषय – संतसंगती (पूर्वरंग), संतचरित्र (आख्यान).

- **मंगळवार दि.२०-११-२०१८** रोजी सकाळी ७.०० वाजल्यापासून 'लघुरुद्र स्वाहाकारा' च्या कार्यक्रमाला सुरुवात होईल. दुपारी १२.३० वाजता यज्ञाचा 'पूर्णाहुती' कार्यक्रम होईल व त्यानंतर उपस्थित भाविकांना यज्ञप्रसादाचे वाटप होईल. रात्रौ ९.०० वाजता धुपारती, आरती आदि झाल्यावर श्री. रानडे यांच्या कीर्तनाचे तिसरे पुष्प- कीर्तनाचा विषय –'जन्माचे सार्थक' (पूर्वरंग), मानाची पालखी (ऐतिहासिक आख्यान).

- **बुधवार दि.२१-११-२०१८** रोजी आरती धुपारती नंतर श्री. रानडे याच्यो कीर्तनाचे चौथे पुष्प- कीर्तनाचा विषय –शिवभक्ती (पूर्वरंग), पावती स्वयंवर (आख्यान).

- **गुरुवार दि.२२-११-२०१८** रोजी 'यात्रेचा दिवस'. त्यामुळे सकाळी १० वाजता बलीपूजनाचा कार्यक्रम होईल. ठीक १२.३० वाजता श्रीदेवाला महाप्रसाद अर्पण करून सर्व उपस्थितांना भोजन प्रसाद देण्यात येईल. भोजन प्रसादाचा कार्यक्रम दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत चालेल. रात्रौ ठीक ८.०० वाजता त्रिपुर पूजन होईल. रात्रौ ८.०० वाजल्यापासून स्थानिक भजन मंडळींचे भजनाचे कार्यक्रम चालू होतील. रात्रौ १२.०० वाजता आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम सुरू होईल व रात्रौ १२.३० वाजता पालखी प्रदक्षिणा, लोटांगण, दरबार झाडणे, गाऱ्हाणी घालणे आदि कार्यक्रम सुरू होतील. त्यानंतर श्रीदेवाला सभास्थानी बसविण्यात येईल. त्यादिवशी ह.भ.प. श्री. रानडे यांचेकडून पाचवे कीर्तनपुष्प सादर होईल. कीर्तनाचा विषय –रामनाम महिमा (पूर्वरंग), 'रामेश्वर स्थापना' (आख्यान) व लळीताचे कीर्तन. यानंतर सर्वाना तीर्थप्रसाद बेलाचे पान देऊन प्रसाद वाटप करणेत येईल. प्रसाद वाटपानंतर सामूहिक प्रार्थना तथा गाऱ्हाणे मांडून उत्सवाची सांगता होईल.

टीप- कलशारोहणाचा समारंभ सुयोग्य मुहूर्तावर करण्यात येणार असल्यामुळे त्याबाबत यथावकाश आपणा सर्वांना निमंत्रण देण्यात येईल.

Scanned by CamScanner

# महत्त्वाच्या सूचना :-

१) बचत खाते नं.१४३७१०१०००००००१(IFC-Code BKID 0001437) बँक ऑफ इंडिया शाखा मिठगवाणे खात्यात रक्कम भरणा केल्यास भरणा पावती व पत्ता देवस्थानच्या संपर्क पत्त्यावर पाठविणे आवश्यक आहे. धनादेश पाठविताना 'श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' अशा नावे पाठवावा.

२) कोणत्याही बँकेमध्ये मुदत ठेवीची रक्कम ठेवून त्याचे वार्षिक व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर करता येईल. तशी सूचना आपण संबंधित बँकेला देणे आवश्यक राहील. तसेच त्यासंबंधी देवस्थानला कळविणे आवश्यक असेल.

३) मनिऑर्डरने रक्कम पाठवताना पाठवणाऱ्याचा पत्ता मनिऑर्डर फॉर्मवर संपूर्ण पिनकोड व फोन नंबर सहित लिहावा.

४) भिमॲप, पेटीयम आदि मार्फत देवस्थानला देणगी पाठवता येईल. मात्र अश्या पद्धतीने देणगी पाठविल्यावर त्या देणगीबाबतचा तपशील आपल्याला कळवावा लागेल.

५) आवश्यक माहितीसाठी मोबा. 9284388731 / 9823277326 7038785001 या फोनवर प्रत्यक्ष संपर्क करावा.

६)संपर्कासाठी milind.desai95@gmail.com उपलब्ध आहे व अधिक माहितीसाठी shreedevanjaneshwar फेसबुक अकाऊंट उपलब्ध आहे.

७) श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानकडे येणारे मार्ग :-

१) एस्.टी.मार्गे रत्नागिरी-नाटे-जैतापूर-मिठगवाणे.

२) एस्. टी. मार्गे राजापूर - जैतापूर - मिठगवाणे.

८) देवस्थान भक्त निवासामध्ये रहायचे असल्यास व भोजन, नाष्टा, चहापानाची सोय होण्यासाठी श्री. सदानंद तुकाराम लिंगायत यांचेशी मोबा. नं. ७२६२९१९५१४ या द्वारे आगाऊ संपर्क साधावा.

Scanned by CamScanner

# 'दोन शब्द' अहवालाबाबत

**देणगीदार, भाविक भक्तमंडळी यांसी–**

**सप्रेम नमस्कार विनंती विशेष.**

श्री अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टचा वार्षिक अहवाल 'विजया दशमीच्या' शुभ मुहूर्तावर आपल्याकडे अवलोकनासाठी पाठविण्यात येत आहे. तसेच या वार्षिक अहवालाची पीडीएफ प्रत श्रीदेव अंजनेश्वरच्या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आलेली आहे. आपण श्रीदेवासाठी पाठविलेल्या देणगीचा यथायोग्य वापर व सांभाळ करून अनेक सोयीसुविधा करण्यात येत आहेत. गेल्या वर्षीच्या कार्तिकोत्सवामध्ये 'वार्षिक अहवाल' देण्याचे आम्ही मान्य केले होते. वर्षातील जमाखर्च त्याच वर्षी आपल्याला कळावा, हा त्यामागील हेतू आहे. अहवाल छपाईमध्ये काही लेखनदोष, अभावित चुका असू शकतील. कृपया आपल्या लक्षात आल्यास आम्हाला कळविण्यास विसरू नये. नकळत चुकांबाबत क्षमा असावी.

अहवालातून आपल्याला देवस्थानच्या वार्षिक जमाखर्चाचा अंदाज येईल. वर्षभरात झालेले कार्यक्रम, त्यामधील भाविकांचा सहभाग, सोलर ऊर्जा निर्मितीसारखे उपक्रम, दैनंदिन देखभाल, देणगीदारांसाठीच्या सूचना, उत्सवाचे निमंत्रण, लघुरुद्रासारखे धार्मिक कार्यक्रम आदींची माहिती या अहवालाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचविली आहे. देवस्थान ट्रस्टची आर्थिक स्थितीची माहिती आपल्यासमोर मांडली आहे. शक्यतोवर बारिकसारिक झालेले कामकाज मांडण्याचा हेतू इतकाच आहे की, आपल्याला देवस्थानच्या दैनंदिन कामकाजाची पूर्ण कल्पना यावी. असो.

'विश्वस्त' हे पद जबाबदारीचे आहे, मिरविण्याचे नाही. जबाबदारी पार पाडताना देवस्थानचे हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन निर्णय घेण्यात आले आहेत. शासन दरबारी पाठपुरावा करताना न्याय, विवेकबुद्धीने मार्ग काढण्यासाठी सतत प्रयत्न केलेले आहेत व झालेल्या प्रयत्नाचे रेकॉर्ड जतन करून ठेवण्यात आले आहे. विश्वस्त कायदा, ट्रस्टचा परिपाठ, विश्वस्तांच्या मर्यादा, पारदर्शक आर्थिक व्यवहार, सर्वांचे मानमरातब जपून कारभार चालविण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकांगीपणा येऊ नये म्हणून वर्षातून दोन वेळा सर्व विश्वस्त, खोत मंडळी, सेवेकरी व मानकरी यांची जनरल सभा बोलावून विचारविनिमय केला आहे. हे सर्व करीत असताना 'श्रीदेवाचा धाक' नजरेसमोर ठेवून कामकाज केले आहे. जेणेकरून कोणतीही चूक आपल्या हातून घडूच नये. नवीन विचार रुजवताना त्रास जरूर होतो, परंतु त्याचा उपयोग येणाऱ्या भविष्यासाठी सुखकर असेल अशी आशा ठेवून त्या त्रासाचा उपसर्ग शरीर–मनाला करून घेतलेला नाही.

'अभ्यासोनि प्रगटावे' ह्या समर्थ वचनाचा आदर्श समोर ठेवून हा वार्षिक अहवाल आपल्याकडे परीक्षणासाठी पाठविला आहे. ऑडिटरच्या कामकाजात जुळवाजुळव कधीच स्वीकारली नाही. सर्व तऱ्हेच्या पूर्तता केल्या आहेत. आपणा सर्वांचा उदंड विश्वास व सहकार्य यामुळे सर्वकाही शक्य झाले आहे. असेच सहकार्य वर्षानुवर्ष मिळत राहो, हीच श्रीदेवाच्या चरणी प्रार्थना ....

आपला नम्र,
**विश्वस्त,**
**श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**
*संपर्कासाठी मोबा.* 9284388731 / 9823277326 / 7038785001
इमेल आय डी– milind.desai95@gmail.com

Scanned by CamScanner

# सन २०१७-१८ वर्षातील झालेल्या कामकाजाचा, सोयी सुधारणांचा व महत्त्वाच्या घटनांचा गोषवारा तथा मागोवा...

• **सौरऊर्जा उत्पादन... एक विशेष उपक्रम..** श्रीदेवाच्या मंदिरासाठी २ KW चा 'सोलर संच' बसविण्यात आला आहे. या सोलर संचातून उत्पादित होणारी सोलर ऊर्जा महाराष्ट्र विद्युत मंडळाला प्रतिमाह विक्री करण्यासाठी करार करण्यात आला आहे. वीज खरेदीतून मिळालेली रक्कम विद्युत मंडळ देवस्थानच्या वीज बिलामध्ये वळती करणार आहे. सोलर संचातून होणाऱ्या वीज निर्मितीतून देवस्थानची विजेची गरज पूर्ण होऊन न वापरलेल्या वीज युनिटची रक्कम देवस्थानच्या वीजबिलामध्ये जमा राहणार आहे. 'ऊर्जा स्वयंपूर्णता', 'ऊर्जा निर्मिती' केल्यामुळे शासकीय अनुदान या प्रकल्पातून देवस्थानला मिळणार आहे. त्याबाबतचा प्रस्ताव करण्यात आला आहे. अश्या पद्धतीची सोलर यंत्रणा बसवण्याचा राजापूर तालुक्यातील हा 'पहिला प्रयत्न' आहे, तर रत्नागिरी जिल्ह्यामध्येही सोलर ऊर्जा निर्मिती करून त्याचा पुरवठा करार विद्युत मंडळाशी करणारे देवस्थान म्हणून आपली नोंद झाली आहे.या कामासाठी श्री. अमेय महेश कुलकर्णी, (सध्या वास्तव्य अमेरिका) यांनी १००० अमेरिकन डॉलर (रु. ६६२२७/-) देणगी म्हणून दिले आहेत. या सोलर संचाची उभारणी श्री.ऋषिकेश कोंडेकर (मूळ माडबन रहिवासी) यांनी केली आहे.

• **देवस्थानच्या जमिनीवरील बांधकामे...** देवस्थानच्या परिसरातील इमारत बांधकामे शासकीय अनुदानातून झालेली असून त्याच्या नोंदी धर्मादाय दप्तरी देवस्थानच्या पी.टी.आर. वर झालेल्या नाहीत. त्या नोंदी होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. त्याकरिता मे. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या आदेशाने 'स्थळ पहाणी' करून देवस्थानच्या परिसरातील सर्व इमारत बांधकामांची मोजमापे महसूल विभागाने घेऊन त्याचा अहवाल जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना पाठवून इमारत बांधकामांच्या नोंदी तलाठी दप्तरी नोंदविल्या आहेत. या इमारतींच्या नोंदी ग्रामपंचायत दप्तरी होण्यासाठी मे. मुख्य कार्यकारी अधिकारी रत्नागिरी यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला लेखी आदेश केले आहेत.या सर्व इमारतींचे असेसमेंट उतारे 'श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' अश्या नावे नोंदले जावेत म्हणून प्रयत्न करण्यात आला आहे. श्रीदेव अंजनेश्वरच्या जमीन जागेवर ही सर्व इमारत बांधकामे झालेली असल्याने कोणत्याही परिस्थितीत सर्व इमारत असेसमेंटला श्रीदेवाचे नाव लागावे या प्रामाणिक हेतूने पाठपुरावा करण्यात आला आहे. या इमारत बांधकामांमध्ये देवस्थानचा स्व निधी खर्च झालेला आहे. सांस्कृतिक कला केंद्र ही इमारत 'यशवंत ग्राम समृद्धी' योजनेतून झालेली असून त्यातील १५% लोकवर्गणीचा हिस्सा रु. दीड लाख देवस्थानकडून भरणा केलेला आहे. तसेच भक्त निवासाच्या अपूर्ण कामाला देवस्थान निधी वापर करून ती इमारत निवासाला योग्य केलेली आहे. 'ज्याची जमीन त्याचा असेसमेंट' हे कायद्याचे सूत्र लक्षात घेतले तर कोणत्याही परिस्थितीत या सर्व इमारत बांधकामांचे असेसमेंट श्रीदेव अंजनेश्वरच्या नावे होणे क्रमप्राप्त असून तर्कसंगत, न्यायसंगत आहे. अर्थात त्यासाठी इतका पाठपुरावा करावा लागत आहे. या सर्व इमारती देवस्थानच्या गरजा पूर्ण करण्याच्या हेतूसाठीच झालेल्या आहेत. भक्त निवास भक्तांच्या रहिवासासाठी बांधण्यात आले तर सांस्कृतिक कला केंद्राचा हॉल देवाच्या समाराधनेसाठी, भोजन प्रसाद करण्यासाठी, देवस्थान मधील सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडण्यासाठीच बांधण्यात आला आहे. लग्न समारंभ, सार्वजनिक मीटिंग, ग्रामसभा आदीसाठी त्या हॉलचा उपयोग व्हावा हे सर्व हेतू दुय्यम आहेत. श्रीदेवाचे नाव सर्व इमारतींच्या असेसमेंटला लावण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणेत आला आहे. ह्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय या इमारतींच्या नोंदी धर्मदाय दप्तरला करता येणार नाहीत.

• **अणुऊर्जा प्रकल्प संपादित जमिनीच्या शिल्लक मोबदला अदाईबाबत ... एक प्रलंबित प्रश्न....** श्रीदेव अंजनेश्वर वहिवाट जमीन स. नं. ५६/८ बाबतच्या मोबदला अदाई बाबतचा गेल्या अहवालामध्ये विस्तृतपणे खुलासा देण्यात आला आहे. शिल्लक मोबदला रक्कम लिंगायत वहिवाटदारांना वाटप करून मिळावी म्हणून

Scanned by CamScanner

ठराव प्रस्ताव देऊनही महसूल विभागाने त्याकडे दुर्लक्ष केले. राजापूर उपविभागीय अधिकारी कार्यालयाने सर्व विश्वस्त, सर्व लिंगायत यांना नोटीस करून दि. १७.३.२०१८ रोजी चौकशीसाठी बोलावले होते. महसूल विभागाने लवकरात लवकर या बाबत अंतिम निर्णय घ्यावा म्हणून लेखी पाठपुरावा करण्यात आला आहे.

●**लिंगायत मानधन ...** कार्तिकोत्सवाच्या जनरल मीटिंग मध्ये ५/६ लिंगायतांनी मानधन पुन्हा सुरू करणेसाठी लेखी अर्ज केलेले आहेत. तसेच काही लिंगायतांनी सन २०१३-१४ वर्षी दिलेल्या मानधनाबाबत स्वाक्षरीचे व्हावचर ऑगस्ट २०१७ मध्ये आणून दिलेले आहे. 'लिंगायत मानधन' पुनश्च चालू करताना सर्व लिंगायतांचे एकमत होणे महत्त्वाचे आहे. मानधन स्वीकारल्यानंतर मिळालेल्या मानधनाबाबत देवस्थानच्या व्हावचरवर स्वाक्षरी करणे बंधनकारक असून तसे न झाल्यास दिलेले मानधन वसुलीस पात्र ठरते अथवा मानधन अदा करणारे ट्रस्टी त्यास जबाबदार ठरवून त्यांचेकडूनही रक्कम वसूल करण्याचा अधिकार धर्मादाय खात्याकडे आहे, ही बाब सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे 'लिगायत मानधन स्वीकारून व्हावचरवर स्वाक्षरी न करणे' ही पूर्वीची चूक/कृती जोपर्यंत सर्व मानधन स्वीकारणाऱ्या लिंगायतांकडून दुरुस्त होत नाही, सुधारली जात नाही तोपर्यंत लिंगायत मानधन पुनश्च सुरू करण्याचा निर्णय घेता येणार नाही. याबाबतचे स्पष्टीकरण यापूर्वीच संबंधितांना दिलेले आहे. विश्वस्त कायदा, ट्रस्टचा परिपाठ व व्यावहारिकता जपून हितकारी व सकारात्मक निर्णय घेणेस प्राधान्य देणेत आले आहे.

● **नवीन विद्युत मीटर....**श्रीदेवाच्या मंदिराचा विद्युत मीटर व श्रीदेवी मुहूर्ताई मंदिराचा विद्युत मीटर 'श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' या नावे नव्याने घेण्यात आले. जुन्या विद्युत मीटरचे डिपॉझिट परत घेण्यात आले आहे. दोन्ही मीटर २५ AMP चे घेण्यात आले आहेत.

● **परिसर स्वच्छता....** मंदिर व मंदिर परिसराची स्वच्छता रहावी म्हणून अल्प मानधन देऊन व्यवस्था लावण्यात आली आहे. निवासी व्यवस्थेची झाडलोट व देखभाल त्यामधून करण्यात येत आहे.

● **सोलर दिव्यांची देखभाल...** सोलर दिव्यांची देखभाल दर तीन महिन्यानी करण्यात येत आहे. जवळपास २० सोलर संचामधील नियमित देखभाल देवस्थानमार्फत करण्यात येत आहे. सदोष संचाबाबतची तक्रार ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आली आहे. अपार प्रयत्न करून सुमारे ४ लाख २० हजार शासकीय अनुदान या सोलर दिव्यांसाठी खर्ची झालेले असल्यामुळे ते सोलर संच कमीतकमी ५/६ वर्ष चालावेत अशी अपेक्षा ठेवून देखभाल ठेवणे, सदोषतेबाबत कळविणे आदि बाबी कर्तव्य भावनेतून केल्या आहेत.

● भक्त निवासाचे मागील बाजूच्या व्हरांड्याला चेकर्ड लाद्या बसविण्याचे काम झालेले आहे.

● **श्रीदेवी मुहूर्ताईचा नवरात्री उत्सव ...एक बदलते स्वरूप...** श्रीदेवी मुहूर्ताईच्या नवरात्र उत्सवामध्ये भजन, दांडिया, हळदीकुंकू समारंभ आदि कार्यक्रम आयोजित करून उत्सवाची शोभा वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे.आरती धुपारती ठीक ९.०० वा. सुरू झाल्यामुळे भाविक भक्तांची उपस्थिती लक्षणीय वाढलेली आहे. विशेषत: महिलावर्गाने या उत्सवाला मोठ्या संख्येने आपली उपस्थिती लावली आहे. जवळपास २००-२५० भक्तमंडळी या उत्सवामध्ये नियमितपणे उपस्थित राहिली आहेत. प्रतिदिन प्रसाद वाटप, त्यासाठी दाता शोधणे आदि कामात श्री. मनोज परमार (भावजी) यांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. यामुळे उत्सवाला नवी उभारी आली आहे. सर्व गावकर मंडळींच्या सहकार्यातून हा उत्सव अधिक मोठा करण्याचा मानस आहे.

● देवाचा इलेक्ट्रिक नगारा दुरुस्त करून घेण्यात आला आहे.

● सोमवारच्या आरतीसाठी, भजनांसाठी नवीन पखवाज घेण्यात आला आहे.

●भोवतीच्यावेळी गाणी म्हणणाऱ्या भक्तांना सुरांची साथ देण्याच्या हेतूने इलेक्ट्रॉनिक तानपुरा घेण्यात आला. तसेच गाणाऱ्या भक्ताचा आवाज सर्वांपर्यंत पोहोचावा म्हणून पोर्टेबल ध्वनी यंत्रणा घेण्यात आलेली आहे. यामुळे उत्सवातील गर्दीतही लहानग्या मुलाच्या गाण्याचा आवाज सर्वांपर्यंत पोहोचू लागला आहे.

● श्रीदेवाचे दोन्ही उत्सव व श्रावणी सोमवार यामध्ये सर्व भाविक भक्तांना खडीसाखर प्रसाद व तीर्थ वाटण्यात येते.त्यामधील खडीसाखर प्रसाद श्री. जयंत शंकर जोशी व बंधू तिवरांबी यांचेकडून प्रतिवर्षी पुरविण्यात येतो.

Scanned by CamScanner

● देवाच्या आडावरील लाकडी चौकड नवीन लाकूड घेऊन बदलण्यात आली आहे.

● कै. श्रीम. नाजाबाई कांबळी हिच्या हिश्याची श्रीदेवी मुहूर्ताईची गुरवकी अल्प मानधन देऊन करवून घेण्यात आली. श्रीदेवीची नित्य पूजाअर्चा चालू राहावी, खंड पडू नये म्हणून ही व्यवस्था करण्यात आली. या बाबत सर्व गावकर मंडळींच्या सहकार्याने कायमस्वरूपी मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

● सभामंडपातील पुरातन ठोक्याचे घड्याळ दुरुस्त व नूतनीकरण करून घेण्यात आले. गॅस शेगडी दुरुस्त करण्यात आली आहे, तसेच तीर्थाची झारीही दुरुस्त करण्यात आली. छोट्या बाबी लक्षपूर्वक जतन करणे हा हेतू त्यामध्ये दडला आहे.

● **श्रावण दिंडी...** सन २०१७ च्या श्रावण सोमवारी श्रीदेव पुर्केश्वर, श्रीदेव गोपालकृष्ण व श्रीदेवी नाटी मंदिर जानशी या ठिकाणी श्रावण दिंडी नेण्यात आली होती. सुमारे ४००/५०० भाविक भक्तांनी त्यामध्ये आपली उपस्थिती, सहभाग नोंदविला आहे. तर २०१८ मधील श्रावण सोमवारी श्रीदेवी भगवती भंडार साखरी या ठिकाणी श्रावण दिंडी नेण्यात आली होती. .याहीवेळी सुमारे ५००/६०० भाविक भक्तांची उपस्थिती लाभली होती. दोन्ही वेळेला दिंडीला होणारे स्वागत उत्स्फूर्त तर होतेच परंतु स्मरणीय जास्त होते.

●आनंद वाचनालय, मिठगवाणे यांचेकडून जागा भाडे म्हणून रु. ९६००/- प्राप्त झालेले आहे. प्रतिवर्षी हे भाडे वाचनालय देवस्थानला देत आहे. सुमारे ८/९ हजार पुस्तकांचे वाचनालय 'आनंद वाचनालय, मिठगवाणे' या नावाने श्रीदेवाच्या मंदिराच्या शेजारीच चालविले जात आहे. दर्जेदार ग्रंथसंपदा वाचकांची प्रतीक्षा करीत आहे.

● **दप्तर सुरक्षा...** सन २००७ ते २०१८ पर्यंतचे ऑडिट रिपोर्ट,कीर्द-खतावण्या, बँक पासबुके, व्हावचर फाईल्स, देणगी पावत्या, मुदत ठेव पावत्या, जनरल सभांची प्रोसिडिंग बुक्स आदि सर्व दप्तर देवस्थानच्या धर्मशाळेच्या खोलीत कपाटबंद ठेवून सुरक्षित ठेवलेले आहे. धर्मदाय विभागाकडून दप्तर तपासणी झाल्यास कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून सदरचे दप्तर क्रमवारीने लावून त्याचे एक रजिस्टर करण्यात आले आहे. देणगीदार तथा हितसंबंधी व्यक्तीलाही दप्तराची पडताळणी करता येईल अर्थात त्यासाठी देवस्थानला अल्प देणगी फी द्यावी लागेल.

● **अकौंटिंग व ऑडिटिंग मधील तत्परता...** सन २०१७-१८ चे आर्थिक वर्ष मार्च मध्ये संपल्यावर सर्व जमाखर्चाचे अकौंटिंग व ऑडिटिंग करून हा ऑडिट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या वेबसाइटला दि. २६.०६.२०१८ रोजी अपलोड करण्यात आलेला आहे. हे काम करण्यासाठी लेखनिक श्री. दत्तात्रय श्रीकृष्ण रानडे, राजापूर यांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. तसेच सी. ए. श्री. निलेश नंदकुमार पाटणकर, राजापूर व त्यांच्या ऑफिसचा स्टाफ यांचेही योगदान मोलाचे आहे.

● **लघुरुद्र स्वाहाकार...** उत्सवातील एकादशीचे दिवशी दि. ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे 'लघुरुद्र स्वाहाकार' हा धार्मिक विधी पार पाडण्यात आला. उपवासाचा दिवस असल्यामुळे उपस्थित सर्व भाविक भक्तांना उपवासाची खिचडी प्रसाद म्हणून वाटण्यात आली. सुमारे २५०/३०० भक्तांनी यज्ञाच्या पूर्णाहुतीला आपली उपस्थिती लावली आहे. या स्वाहाकाराला श्री. विजयराव भुस्कुटे, श्री. दीपक ताम्हनकर, श्री. अमित निमकर, यांनी त्यामध्ये पुढारपण घेऊन अन्य ब्रह्मवृंदांच्या मदतीने हा कार्यक्रम यथासांग पार पाडला आहे. या स्वाहाकाराला बाकाळे गावचे खोत श्री. पवन बाळाजी परांजपे हे सपत्निक यजमानी होते.

●**वार्षिक होळी उत्सव...** सन २०१७-१८ मधील बारागावची होळी श्रीमान साखरकर खोत, भंडारसाखरी यांचेकडे होती. साखरकर खोत मंडळींनी केलेले स्वागत, त्यांचा उत्साह, मुंबईकर मंडळींची उपस्थिती व केलेले आदरातिथ्य विशेष स्मरणीय ठरले आहे. तर गावाची होळी श्री. विवेक जोगळेकर यांचेकडे होती. त्यावेळी श्री. मोहन मेस्त्री व कुटुंबियांनी केलेले स्वागत व आदरातिथ्य ठळकपणे लक्षात राहील.

Scanned by CamScanner

**●जनरल मीटिंग...** दि. २३.१०.२०१७ रोजी कार्तिकोत्सवाची जनरल मीटिंग पार पडली, तर दि. ०५ फेब्रुवारी २०१८ रोजी महाशिवरात्री उत्सवासाठीची मीटिंग पार पडली. देवस्थान विश्वस्त, खोत मंडळी, मानकरी, सेवेकरी यांना नोटीस करून मीटिंगला उपस्थित रहाण्यास सांगण्यात आले होते व त्याप्रमाणे जवळपास ५०/५५ च्या उपस्थितीमध्ये दोन्ही मीटिंग पार पडल्या. उत्सवाचे नियोजनामध्ये सर्वांचा समावेश असावा, सर्वांच्या सूचना, अभिनव कल्पना लक्षात याव्यात म्हणूल जनरल मीटिंगचे प्रयोजन करण्यात येते. कामकाजात पारदर्शकता रहावी, सर्वांना जमाखर्चाची माहिती मिळावी, एकांगी कारभार न होता सर्वसमावेश कामकाज व्हावे हा त्यामागील मूल हेतू आहे.

**● धर्मादाय निधीची प्राप्ती...** अर्बन बँक राजापूर यांचेकडे पत्र संपर्क साधल्यामुळे त्यांचेकडून राखीव धर्मादाय निधी रु. १००००/- देवस्थानला प्राप्त झालेला आहे. देवस्थानकडून बँकेचे आभार मानण्यात आले आहेत.

**● निवास व्यवस्था...**श्रीदेवाच्या दोन्ही उत्सव कालावधीत येणाऱ्या सर्व निवासी भाविक भक्तांना देवस्थानकडून निवासी सुविधा पुरविण्यात आल्या. तसेच दोन्ही वेळचे भोजन, चहापान, अल्पोपहार आदि निःशुल्क पुरविण्यात आले. ही सर्व व्यवस्था श्री. सदानंद तुकाराम लिंगायत व त्यांच्या पत्नी सौ. स्मिता सदानंद लिंगायत यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक पार पाडली. अनेक भाविक भक्तांनी त्यांच्या पाहुणचाराबाबत विशेष फोन करून त्यांचे आभार मानले आहेत. सर्व निवासी खोल्यांची वार्षिक साफसफाई हे कामकाजही गेली तीन चार वर्षे त्यांचेकडून पार पाडले जात आहे.नेहमी येणाऱ्या निवासी भाविकांना त्यांचेकडून अल्प मोबदल्यात भोजनसेवा मिळत आहे. भक्त निवास व मागील धर्मशाळेच्या इमारतीमध्ये परगावच्या भाविक भक्तांसाठी निवासी रहिवास व्यवस्था करण्यात आली आहे. माफक शुल्क घेऊन त्यांची भोजनाची सोय, नाश्तापाण्याची सोय करण्यात येते. मात्र याकरिता आगाऊ संपर्क साधावा लागतो. भोजनासाठी डायनिंग टेबल, खुर्च्यांची सोय करण्यात आलेली आहे. सांस्कृतिक कला केंद्र व भक्त निवासातील दोन हॉल विवाह समारंभासाठी माफक शुल्क घेऊन सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. २०० खुर्च्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

**● नामसंकीर्तन उत्सवातील अविभाज्य भाग...** सन २०१७-१८ या कालावधीत दर्जेदार कीर्तनकारांना उत्तम साथसंगतीसह बोलवून नामसंकीर्तनाची वर्षानुवर्षे जपलेली परंपरा विशेष अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दर्जेदार कीर्तनांचा लाभ सर्व रसिक श्रोत्यांना झालेला आहे. श्रीदेवाच्या कार्तिकोत्सवामध्ये ह.भ.प. श्री. अनंत केशव कर्वे, पनवेल यांची कीर्तने झाली. त्यासाठी प्रसिद्ध ऑर्गन वादक श्री. केदार भागवत, मुंबई यांची साथ मिळाली व तबला साथ श्री. गणेश घाणेकर, पनवेल यांनी केली. पाच दिवस वेगवेगळ्या विषयांवर कीर्तन श्रवणाचा लाभ भाविकांना झाला.श्रीदेवाच्या महाशिवरात्री उत्सवाला पुण्यातील प्रसिद्ध कीर्तनकार श्री.वासुदेवबुवा बुरसे यांची कीर्तने झाली. त्याकरिता प्रसिद्ध ऑर्गन वादक श्री. उदय गोखले, नाणार यांची साथ लाभली तर तबला साथ श्री. आनंदा ओळकर कशेळी यांनी केली.

**●उत्सवातील मनोरंजक कार्यक्रम...** श्री. श्रीधर बाबू पावसकर यांच्या पुढाकारातून 'स्वरबहार' ऑर्केस्ट्राचे आयोजन कार्तिकोत्सवामध्ये करण्यात आले होते. रसिक प्रेक्षकांनी आपली उपस्थिती व सहभाग नोंदवून गाण्यांचा आनंद लुटला.

**● सत्कार कार्यक्रम...** मिठगवाणे ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीत श्री. बलवंत गणपत सुतार यांची लोकनियुक्त सरपंच म्हणून निवड झाली. त्याबद्दल त्यांचा देवस्थानकडून शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पंचायत सदस्या सौ. साक्षी संतोष जैतापकर यांचा सत्कार शाल, श्रीफळ देऊन करण्यात आला. दहावी शालान्त परीक्षेमध्ये १००% गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या कु. मुक्ताई देसाई हिचा सत्कार शाल, श्रीफळ देऊन करण्यात आला.

Scanned by CamScanner

● **अहवाल वितरण...** सन २०१२ ते २०१७ पर्यंतचा पंचवार्षिक अहवाल सुमारे १००० देणगीदारांना टपाल सेवेमार्फत पाठविण्यात आला. तसेच हा अहवाल श्रीदेव अंजनेश्वरच्या फेस बुक अकाउंटला अपलोड करून सर्वासाठी कायमस्वरूपी उपलब्ध करून ठेवण्यात आलेला आहे. यामुळे अहवालाबाबत प्रतिकिया नोंदविणे अनेकांना शक्य झाले व देवस्थानचा कारभार अहवाल रूपाने प्रत्यक्ष देणगीदार नसलेल्या लोकांपर्यंत, परदेशस्थ भाविकांपर्यंत पोहोचला आहे. यामुळे गेल्या वर्षभरात देणगीचा ओघ वाढलेला दिसून येत आहे.

● श्रीदेवाचे मंदिराचा बाहेरील भाग, कालभैरव मंदिर, श्रीदेवी भराडीण मंदिर व मागील धर्मशालेचा बाहेरील भाग ऑईल बाँडने रंगविण्यात आला.

●प्रतिवर्षी लिंगायत गुरवांच्या गुरवकीची महिनावार लिस्ट दर वर्षीच्या आषाढ महिन्यात आगाऊ लावण्यात येते. यामुळे गेल्या १०/१२ वर्षात गुरवकीबाबत कोणतीही अडचण आली नाही.

● **सूचना वही...** भाविक भक्तांच्या सूचना, तक्रारी किंवा अन्य बाबी आमच्यापर्यंत पोहोचाव्यात म्हणून मंदिरामध्ये सूचना वही ठेवण्यात आली आहे. कुणीही भाविक अथवा देवस्थान हितसंबंधी व्यक्ती त्यामध्ये आपल्या सूचना,तक्रारी, अभिप्राय लिहू शकतात. सुचविलेल्या सूचनांचा आदर केला जातो.

● **मंदिर व परिसर सी.सी. टी.व्ही. खाली...** श्रीदेवाचे संपूर्ण मंदिर व सभोवतालचा परिसर सी.सी.टी.व्ही. मध्ये आलेला आहे. श्री. निलेश संभाजी चेऊलकर यांनी ही यंत्रणा देवस्थानला स्वखर्चाने बसवून दिल्यामुळे मंदिर परिसर सुरक्षित झाला आहे.

● श्रीदेवाचे मंदिर, धर्मशाळेतील खोल्या व श्रीमुहूर्ताई मंदिरामध्ये पेस्ट कन्ट्रोलचे काम करून घेतल्यामुळे वाळवी, मुंग्यांचा प्रादुर्भाव कमी झाला आहे. श्री. जगदीश चेऊलकर यांनी स्वखर्चाने हे काम केले आहे.

● **सोमवारची आरती...** दर सोमवारी संध्याकाळी ७.०० वाजता श्रीदेवाच्या मंदिरात आरती होतात. माडबन पासून अनेक भाविक त्यामध्ये उपस्थित असतात. सन १९९४ पासून सातत्याने हा उपक्रम सुरू आहे. सामान्यपणे या आरतीला ५०/५५ ची उपस्थिती असते. आरती अगदी वेळेवर चालू होतात व केवळ चार आरती म्हणून वेळेवर समाप्त होतात हे याचे महत्त्व आहे.

● **काकडा आरती...** नरक चतुर्दशीला सकाळी ५.३० वाजता काकडा आरती झाली. हा उपक्रमही सन १९९४ पासून अविरत चालू आहे. याला जवळपास १००/१२५ भाविक उपस्थित राहिले होते. लाडू वाटप, चहापान करण्यात आले.

● **श्रावणातील नामजप...** शेवटच्या श्रावण सोमवारी 'नामजपाचा' कार्यक्रम पार पाडण्यात आला. हा उपक्रम तर ३०/३५ वर्षांपेक्षाही पूर्वीचा आहे. कै सुधाकर पांडुरंग ऊर्फ दादा पाटणकर व कै. काशीविश्वेश्वर शंकर मुकादम (तलाठी) यांच्या प्रयत्नातून सुरू झालेला कार्यक्रम अद्यापही सातत्याने सुरू आहे, खंडित झालेला नाही. उपस्थित भाविकांना चहापान देण्यात आले.

●उत्सवामध्ये नेत्रदीपक रोषणाई करणेत आली. त्यामध्ये श्री. निलेश तिवरांबकर (सविताज इव्हेंट मॅनेजमेंट) यांनी मंदिरावर व मंदिर परिसरावर केलेली एलएडी बल्बची रोषणाई चित्ताकर्षक ठरली.

● **भोजन प्रसाद तथा समाराधना ...** त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी बलिपूजन झाल्यावर श्रीदेवाला नैवेद्य दाखविणे, तसेच श्रीदेवी मुहूर्ताईसह अन्य देवतांना नैवेद्य दाखविणे व त्यानंतर सुमारे २००/२५० सेवेकरी- मानकरीवर्गाला भोजन प्रसाद देणे इतकेच मर्यादित स्वरूप समाराधनेचे होते. सर्व भक्तांना भोजन प्रसाद मिळावा या हेतूने त्याचे स्वरूप हळू हळू बदलत गेले. भोजन प्रसादाचा संपूर्ण खर्च देणारे अनेक दाते पुढाकार घेऊ लागले. सामान्यपणे दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत भोजन प्रसादाची वेळ आखून देण्यात आली. त्यामधील 'मी तू पण' प्रयत्नपूर्वक संपविण्यात आले. 'सहना ववतु सहनो भुनक्तु' ही वेदांची शिकवण कृतीत आणण्यात आली. समाराधनेचे स्वरूप दिवसेनदिवस वाढत आहे. जवळपास २२००/२३०० भाविक भक्तांनी भोजन प्रसादाचा यावर्षी लाभ घेतला. अनेक भक्तमंडळी, सेवेकरी, लहान लहान मुले यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतात.यामधील सर्व कामांची विभागणी केलेली असल्याने सर्वकाही सुरळीत होते. या वाढलेल्या स्वरूपामुळे मंडप व्यवस्था, बैठक व्यवस्था, सर्व भांडीसामान मुबलक

Scanned by CamScanner

प्रमाणात उपलब्ध झालेले आहे. वेळ व शिस्त याचे काटेकोर पालन करणारी 'समाराधना' प्रत्येक भक्ताने अनुभवली पाहिजे, असे विनम्रपणे सुचवावेसे वाटते.

●रात्री ठीक ९.०० वाजता सुरू होणारा उत्सव सुरू होण्यात याही वर्षी खंड पडला नाही. सर्व सेवेकरी, मानकरी यांच्या सहकार्यातून कार्तिकोत्सवाची व महाशिवरात्री उत्सवाची सुरुवात रात्री ठीक ९.०० वाजता धुपारतीने होते, हे आवर्जून सांगावेसे वाटते. यामुळे आरती, भोवती कार्यक्रम अगदी नियोजित वेळी पूर्ण होऊन कीर्तनाची सुरुवात ठरविलेल्या वेळी होते. तसेच कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम असला तरी त्याच्या सादरीकरणाला पुरेसा वेळ मिळतो. वेळेचे काटेकोर पालन झाल्यामुळे सर्वांनाच सेवा करण्याचा लाभ मिळतो. दररोजचे कार्यक्रम वेळीच संपत असल्यामुळे जागरणाचा त्रासही होत नाही. अर्थात हा बदल सहज झालेला नाही. त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली व त्यामध्ये प्रयत्नपूर्वक सातत्य ठेवावे लागले. ज्यांनी ज्यांनी हा उत्सव प्रत्यक्ष पाहिलेला नसेल त्यांनी अवश्य भेट देऊन हा नियोजनाचा उत्सव पहावा, असे आम्ही आग्रहाने सांगतो आहे.

● **सुवर्ण कलशाबाबत...** श्रीदेवाच्या मंदिरावर सोन्याचा कळस बसविण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्यानुसार रु. २१ लाखाचे सोने सुवर्ण कलशासाठी खरेदी करण्यात आले आहे. मेसर्स ज्वेलर्स गोखले ब्रदर्स, कोल्हापूर (मूळचे रहिवासी दळे) यांचे मार्फत कळसाचे घडावट कामाला सुरुवात झालेली आहे. श्री. रमेश भगवान काजवे यांनी पुढाकार घेऊन कळस निधी संकलनाचे काम केले आहे.

● **देणगीदार रजिस्टरचे नूतनीकरण ...**देवस्थानच्या देणगीदारांच्या पत्त्यात बदल होतात. झालेले बदल देणगीदारांकडून कळविले जात नाहीत.परिणामी पाठविलेली निमंत्रणे पोहोचत नाहीत. गेल्या १० वर्षातील देणगीपावत्यांचा मागोवा घेऊन नव्याने पत्ता रजिस्टर तयार करण्याचे काम अत्यंत मेहनतीने केलेले आहे.देणगीदारांनी आपले बदललेले पत्ते पत्रव्यवहार करून देवस्थानला कळवावेत.

●देवस्थानचा सर्व खर्च धनादेशाद्वारे करण्यात आलेला आहे.काही अपवाद वगळता कोणताही खर्च रोख रक्कमेने केला जात नाही.

●**देवस्थानची आर्थिक स्थिती...** देवस्थानचा रु. एक कोटी सत्तर लाखाचा निधी राजापूर अर्बन बँक जानशी पठार शाखा यामध्ये मासिक प्राप्ती ठेव योजनेमध्ये ठेवून त्याचे मासिक व्याज श्रीदेवाच्या बचत खात्याला मिळविले जात आहे. तसेच रु. एकावन्न हजाराच्या दोन मुदत ठेवी कायम निधी म्हणून ठेवलेल्या आहेत व त्याचे तिमाही व्याज देवस्थान बचत खात्याला मिळविले जात आहे. 'सुवर्ण कलश' योजनेतील देणगीतून रु. २१ लाखाचे सोने खरेदी करण्यात आले आहे. कै. गौरी हरी देसाई यांचे स्मरणार्थ रु. २५०००.०० ची मुदत ठेव श्री. नारायण हरी देसाई यांनी ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. कै. गोपाळ विष्णू देवधर यांचे स्मरणार्थ रु. २००००.०० ची मुदत ठेव श्री. प्रदीप गोपाळ देवधर यांनी ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. श्री. अतुल सदाशिव भोगले यांनी रु. १००००.००ची मुदत ठेव ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. श्री. ओंकार महेश नेने यांच्या मुदत ठेवीतील व्याज श्रीदेवाच्या बचत खात्याला ट्रान्स्फर झालेले आहे. श्री. नंदकुमार मधुसूदन परांजपे रु. २०००००.०० यांनी ठेवलेल्या मुदत ठेवीतून मिळणारे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. सदर मुदत ठेवीची रक्कम कै. गो. बा. देसाई (ट्रस्ट नोंदणी क्र. ६६) यांच्या ठिकाणामधील सागवान विक्रीतून त्यांचेकडे एकरकमी जमा झालेली होती, ती मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यात आली आहे. तर देवस्थानच्या बचत खात्यात रु. दोन लाखाच्यावर रक्कम जमा आहे. देवस्थानची आर्थिक स्थिती अतिशय चांगली झाली आहे.

(सन २०१७-१८ व त्यानंतरच्या कालावधीत झालेल्या कामांचा, घडामोडींचा आढावा ढोबळपणे घेतलेला आहे.)

Scanned by CamScanner

# श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान मिठगवाणे

## सन २०१७-२०१८ तेरीज पत्रक

| रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | खर्च |
|---|---|---|---|
| १८,९४३.५० | हाती रोख | १,४३,४०९.०० | बांधकाम खर्च |
| ९,१२,४३५.७० | बँक ऑफ इंडिया खाते | १८,२६०.०० | विद्युत बिले |
| १,८५,७१२.५० | देणगी जमा | ५५०.०० | पालखी सजावट खर्च |
| १२,०५,४१४.०० | स्थिरनिधी व्याज | ६०,१९५.०० | टीडीएस कपात |
| १,०००.०० | इतर जमा | १५,०००.०० | लेखनिक मानधन |
| १,५६,५५३.०० | उत्सव देणगी जमा | २२,०१०.०० | सफाई, स्वच्छता खर्च |
| ४७,३३१.०० | बँक व्याज | ३४,३३२.०० | देखभाल दुरुस्ती |
| १,५०,७५२.०० | सुवर्ण कळस निधी | १८,०००.०० | ब्राह्मण पुजारी मानधन |
| १३,६६०.०० | भाडे जमा | ७,०००.०० | पोस्टेज |
| ३,५७०.०० | वस्तुरूप देणगी | ३,०४,२३४.०० | उत्सव खर्च |
| ४३,४१२.०० | देणगी(व्याज) | २,८२५.०० | वहातुक |
| १,९४५.०० | उत्सव जमा आरती | २९,६००.०० | छपाई |
| ४,६००.०० | साडी विक्री जमा | ७१,८९६.०० | रंगकाम खर्च |
| ५५०.०० | पालखी सजावट देणगी | १,५००.०० | चांदीचे अलंकार |
| ४००.०० | उत्सव साहित्य देणगी | २६,७२०.०० | कायम सामान |
| १,६७,६५,४४४.५३ | स्थिरनिधी जमा | ४५०.३१ | कमिशन |
| | | ३,२४५.०० | विद्युत साहित्य खर्च |
| | | ५७५.०० | झेरॉक्स खर्च |
| | | १,७५,००,०००.०० | स्थिरनिधी रक्कम |
| | | | अखेर शिल्लक |
| | | १२,२३,४५७.९२ | बँक ऑफ इंडिया खाते |
| | | २८,४६४.०० | हाती रोख |
| १,९५,११,७२३.२३ | एकूण जमा | १,९५,११,७२३.२३ | एकूण खर्च |

**विश्वस्त,**
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
ता. राजापूर, जि. रत्नागिरी

Scanned by CamScanner

# रु. ५०० व त्यावरील देणगीदारांची यादी

## सन २०१७-२०१८

| पावती क्र. | देणगीदार | | रक्कम |
|---|---|---|---|
| २ | गोपाळ गणेश परांजपे | रु. | ५००/- |
| ५ | गणेश प्रसाद जयराम भीबे | रु. | १५००/- |
| ७ | रामचंद्र यज्ञेश्वर फडके | रु. | ५०१/- |
| ८ | अमोल रामचंद्र फडके | रु. | ५०१/- |
| ९ | मंजुश्री अमरेश लोकरे(फडके) | रु. | ५०१/- |
| १० | काव्या स्वप्नील लिंगायत | रु. | ५०१/- |
| ११ | स्व.महानंदा शिरवडकर स्मरणार्थ प्रवीण प्रकाश शिरवडकर | रु. | १००१/- |
| १३ | अन्वीता संकेत लिंगायत | रु. | ५०१/- |
| १४ | कै. वामन नारायण लिंगायत स्मरणार्थ शामकांत भिकू लिंगायत | रु. | ५०१/- |
| १५ | कै. सुचिता शामकांत लिंगायत स्मरणार्थ शामकांत भिकू लिंगायत | रु. | ५०१/- |
| २५ | मिलिंद वसंत राजापकर | रु. | ५०१/- |
| २६ | वसंत भास्कर मोहिते | रु. | ५०१/- |
| २७ | सचिन चंद्रकांत मोहिते | रु. | ५०१/- |
| ३७ | गौरव देवदत्त मांजरेकर | रु. | ५००१/- |
| ४६ | केतन काळे | रु. | १००१/- |
| ४७ | प्रभाकर कृष्णाजी भोगले | रु. | ५०१/- |
| ४८ | भुस्कुटे बंधू गोवा | रु. | ५००/- |
| ४९ | माधुरी प्रभाकर शिंदे | रु. | ११११/- |
| ५० | रविंद्र अनंत भुस्कुटे | रु. | ११११/- |
| ६९ | सुरेश जोशी कुवेशी | रु. | ५००/- |
| ७७ | जोशी बंधू तिवरांबी | रु. | ५०१/- |
| ७८ | मिनाक्षी गंगाराम पावसकर | रु. | ५०१/- |
| ८४ | प्रमोद यशवंत वैद्य | रु. | ५०१/- |
| ८५ | मुकुंद यशवंत वैद्य | रु. | ३००१/- |
| ८९ | कै. दत्तात्रय वामन आपटे स्मरणार्थ शैलेंद्र मोडक | रु. | ५०१/- |
| ९० | प्रशांत कैलास कांबळी | रु. | ५०१/- |
| ९१ | हर्षित, मौक्तिक, अंतरा (ठाणे) | रु. | ५००/- |
| ९२ | गणपत गंगाराम आंबेरकर | रु. | ५००/- |
| ९५ | दत्ताराम मांजरेकर | रु. | ५०१/- |
| ९९ | नारायण महादेव मसुरकर | रु. | ५०१/- |
| १०० | गणपत लक्ष्मण बावकर | रु. | १००१/- |
| १०८ | सागर देविदास मयेकर | रु. | ५०१/- |
| १०९ | अरुण बाळकृष्ण गुरव | रु. | ५०१/- |
| ११६ | खोत विकास मंडळ,चव्हाणवाडी | रु. | ५०१/- |
| ११८ | पराग जोगळेकर | रु. | १०००/- |
| १२२ | कै.गणेश सिताराम प्रिंदावणकर स्मरणार्थ ओंकार प्रिंदावणकर | रु. | ६०८/- |
| १२९ | 'क्ष' | रु. | ५००/- |
| १५१ | राजेंद्र अनंत भुस्कुटे | रु. | ५०१/- |
| १५८ | गीता श्रीकृष्ण नार्वेकर | रु. | ५०१/- |
| १६६ | वैभव वसंत जैतापकर | रु. | १२५१/- |
| १६९ | रमेश जयराम शिर्सेकर | रु. | ११११/- |
| १७० | प्रकाश जयराम शिर्सेकर | रु. | ५०१/- |
| १७३ | कै. मृणालिनी चेऊलकर स्मरणार्थ मोहन चेऊलकर | रु. | ५०१/- |
| १७७ | संध्या विलास जोशी | रु. | ५०१/- |
| १९० | अनिकेत नरेश शिंदे | रु. | ५०१/- |
| १९१ | अश्विनी अरुण जुवेकर | रु. | ५००/- |
| १९७ | कै. दामोदर राऊत स्मरणार्थ सुधीर दा. राऊत | रु. | ५०१/- |
| १९८ | यशवंत निळकंठ लिंगायत | रु. | १७०१/- |
| २०६ | प्रभाकर रघुनाथ खानविलकर | रु. | ५०१/- |
| २३५ | कला भालचंद्र शिवणेकर | रु. | १०५१/- |
| २३८ | कृष्णा सिताराम शिंदे | रु. | ५०१/- |
| २४० | विलास चेऊलकर | रु. | ५००/- |
| २५४ | यशवंत चिंतामणी पाटणकर | रु. | ५०००/- |
| २५६ | कमलाकर पुनाजी मुटाटकर | रु. | ५०१/- |
| २५९ | सौरभ, कीर्ती, विनोद बोटले | रु. | १००१/- |

Scanned by CamScanner

| पावती क्र. | देणगीदार | | रक्कम |
|---|---|---|---|
| २७१ | महेश बाबाजी घाटये | रु. | ५०१/- |
| २७२ | ज्ञानेश्वर दत्ताराम गवाणकर | रु. | ५०१/- |
| २७५ | पूजा दरडीकर | रु. | ५०१/- |
| २९२ | अशोक मनोहर तेली | रु. | ५०१/- |
| २९४ | सदानंद गंगाराम तेली | रु. | १००१/- |
| २९७ | गितेश बोटले | रु. | ५००/- |
| २९८ | दिलीप कणेरी | रु. | ५०१/- |
| ३१३ | वासुदेव रामचंद्र भुस्कुटे, गोवा | रु. | ५०१/- |
| ३१४ | शुभम विजय भुस्कुटे | रु. | ५०१/- |
| ३१८ | नुपूर चंद्रकांत मयेकर | रु. | ५०१/- |
| ३२० | सीमा चंद्रकांत मयेकर | रु. | ५०१/- |
| ३२२ | कै.विलास हळदणकर स्मरणार्थ | | |
| | सौ. पूनम विराज नार्वेकर | रु. | ५००/- |
| ३२५ | श्रीमती मालतीबाई लिंगायत | रु. | ५००/- |
| ३५३ | मुद्रा श्रीकांत लिंगायत | रु. | ५०१/- |
| ३८७ | रमेश शांताराम राणे | रु. | ५०१/- |
| ३९१ | सचिन विष्णुपंत पाटणकर | रु. | १००१/- |
| ३९२ | हेमलता रमाकांत पाटणकर | रु. | ५०१/- |
| ४१३ | सुधाकर गोपाळ शिर्सेकर | रु. | ५०१/- |
| ४१४ | अवनीश सुधाकर शिर्सेकर | रु. | ५०१/- |
| ४१६ | अनिल पांडुरंग गवाणकर | रु. | ५०१/- |
| ४१७ | श्रुती विश्वनाथ गवाणकर | रु. | १००१/- |
| ४१८ | हिमांशु प्रकाश भोमकर | रु. | १००१/- |
| ४४१ | नितीन सदाशिव धुरी | रु. | ५०१/- |
| ४४७ | क्षितीज नवनीत मोहिते | रु. | ५०१/- |
| ४४८ | कै. एकनाथ पुंडलीक मोहिते स्मरणार्थ | | |
| | मधुरा मिलिंद टापरे | रु. | २५५१/- |
| ४५२ | सुहासिनी नंदकुमार चितळे | रु. | ५०१/- |
| ४५३ | वेदा विजय कदम | रु. | ५०१/- |
| ४५९ | भिकाजी भिवाजी सुर्वे | रु. | ५००/- |
| ४७१ | मिलिंद गणेश फडके | रु. | २००१/- |
| ४७२ | प्रफुल्ल कल्याण कोंडेकर | रु. | ५०१/- |
| ४८० | कै. केरोजी बाळकृष्ण वाघधरे स्मरणार्थ | | |
| | श्री. अनिल वाघधरे | रु. | २१००/- |
| ४८४ | ॲड्. शशिकांत सुतार | रु. | १००१/- |

| पावती क्र. | देणगीदार | | रक्कम |
|---|---|---|---|
| ४८७ | संतोष सुरेश कांबळी | रु. | १००१/- |
| ४८९ | मनोहर सीताराम सोमण | रु. | ५००/- |
| ४९० | संतोष वैद्य | रु. | ५००/- |
| ४९८ | प्रकाश गंगाराम कांबळी | रु. | ७५१/- |
| ५०१ | कै. विठ्ठल अ. जैतापकर स्मरणार्थ | | |
| | तुकाराम वि. जैतापकर | रु. | १०००/- |
| ५१७ | विनायक गंगाधर नेने | रु. | ५०१/- |
| ५३९ | प्रकाश विश्वनाथ काजवे | रु. | ५०१/- |
| ५४२ | उदय बाळकृष्ण दांडेकर | रु. | ५०१/- |
| ५५४ | ओंकार अंकुश सरंबळकर | रु. | ५०१/- |
| ५६३ | निखिल/किमया राऊत परिवार | रु. | ५०१/- |
| ५७९ | प्रवीण प्रकाश शिरवडकर | रु. | ५००/- |
| ५८० | पूनम महादेव उन्हाळेकर | रु. | ५०१/- |
| ५९३ | उमेश दशरथ शिरवडकर | रु. | ५०१/- |
| ६०१ | सुभाष दत्तात्रय कांबळे | रु. | १०००/- |
| ६०४ | दिलीप गणपत मोहिते | रु. | १००१/- |
| ६१८ | आनंदी प्रशांत मोहिते परिवार | रु. | १२०१/- |
| ६५४ | सुहासिनी केबल नेटवर्क | रु. | १००१/- |
| ६५६ | प्रणय/प्रतिक मांजरेकर | रु. | ५००/- |
| ६५७ | दिनकर नारायण शिंदे | रु. | ५००/- |
| ६५९ | महालक्ष्मी पिओ ड्रिंक | रु. | ११००/- |
| ६६० | देविदास भि. कुडाळकर | रु. | ५००/- |
| ६६४ | किशोर कल्याण गिरकर | रु. | १००१/- |
| ९५३ | संचित दाजी आरेकर | रु. | ५०१/- |
| ९५४ | अजित भाऊ मराठे | रु. | ५०१/- |
| ९५५ | चिंतामणी कृ. भुस्कुटे | रु. | १००१/- |
| ९५६ | सुनील हळदणकर | रु. | ५००/- |
| ९५७ | श्रीपाद भुस्कुटे आणि बंधू | रु. | १५००/- |
| ९६१ | गिरीश रघुनाथ धनावडे | रु. | ५००/- |
| ९६३ | निलेश श्रीधर चेऊलकर | रु. | १००१/- |
| ९६४ | मोहन रामचंद्र वाघधरे | रु. | २०११/- |
| ९६५ | कै. माधव वा. फडके स्मरणार्थ | | |
| | शरदचंद्र फडके | रु. | १००१/- |
| ९६६ | नंदकुमार म. परांजपे | रु. | १०००/- |
| ९६७ | सदाशिव भार्गव ताम्हनकर | रु. | ११००/- |

Scanned by CamScanner

| पावती क्र. | देणगीदार | | रक्कम |
|---|---|---|---|
| ९७४ | निळकंठ पांडुरंग नेने | रु. | ५००/- |
| ९७५ | हरिश्चंद्र व अनंत मोहिते | रु. | ५०१/- |
| ९७९ | दिपक हरी मेस्त्री | रु. | १५००/- |
| ९८० | शैलेश भोगले | रु. | ५०१/- |
| ९८१ | विकास वि. राणे | रु. | ५०१/- |
| ९८२ | मधुकर गोपाळ पावसकर | रु. | ७००/- |
| ९८६ | गायत्री अमर आडिवरेकर | रु. | २०५१/- |
| ९८७ | गोविंद गोपाळ पाटणकर | रु. | ५०१/- |
| ९८८ | प्रकाश सदानंद मांजरेकर | रु. | ५०२/- |
| ९९४ | अरविंद राजाराम चेऊलकर | रु. | १००१/- |
| १००० | दिवाकर गो. भोगले | रु. | ५००/- |
| ११०१ | पियुष देसाई | रु. | १०००/- |
| ११०२ | योगेश्वर विष्णू नेने | रु. | १०००/- |
| ११०३ | निखिल दामले | रु. | ५०१/- |
| ११०४ | कै. गंगाराम नाणारकर स्मरणार्थ सतीश नाणारकर व सत्यवान नाणारकर कडून | रु. | ५००१/- |
| ११११ | विजय भुस्कुटे | रु. | ५०१/- |
| १११३ | संजीव पुरुषोत्तम मोहिते | रु. | ५०१/- |
| १११४ | रविंद्र शंकर कुळकर्णी | रु. | ५०१/- |
| १११६ | जगदीश दयाळ नार्वेकर | रु. | ५००/- |
| १११७ | अमीत विजय कुळकर्णी | रु. | ५००/- |
| १११८ | महेश दत्तात्रय भुस्कुटे | रु. | ५०१/- |
| १११९ | भास्कर वि. भोगले | रु. | ५००/- |
| १०५० | कै. मोहन विष्णु धारकर व कै. चंद्रभागा मोहन धारकर स्मरणार्थ सौ. रेखा रविकांत गिरकर | रु. | १००००/- |
| १०५४ | मुकुंद गोविंद गोडबोले | रु. | ५००/- |
| १०५६ | प्रकाश पर्शराम गोखले | रु. | १०००/- |
| १०६४ | शिवराम के. जैतापकर | रु. | ५०१/- |
| १०६७ | धनलक्ष्मी एस्. चेऊलकर | रु. | २१०१/- |
| १०६८ | अनघा एस्. ओक | रु. | ५५१/- |
| १०७१ | शरद एम्. देसाई | रु. | ५०१/- |
| १०७३ | गीता सोनकांत कांबळे | रु. | ५००/- |
| १०७७ | श्रीधर डी. गवाणकर | रु. | ५००/- |

| पावती क्र. | देणगीदार | | रक्कम |
|---|---|---|---|
| १०७९ | उपेंद्र नारायण देसाई | रु. | ५०१/- |
| १०८४ | यशवंत वासुदेव मालपेकर | रु. | ५००/- |
| १०८८ | उल्हास अ. मांजरेकर | रु. | ५००/- |
| १०९१ | हरिश्चंद्र महादेव आडिवरेकर | रु. | २०५१/- |
| १०९३ | गिरिधर पांडुरंग नेवरेकर | रु. | ५५५/- |
| १०९४ | निलकंठ पांडुरंग नेने | रु. | १०००/- |
| १०९७ | पवन बाळाजी परांजपे | रु. | १००१/- |
| ११०० | माधव नारायण वैद्य | रु. | ५०१/- |
| ११५१ | शशिकांत पांडुरंग पाटणकर | रु. | ५०१/- |
| ११५४ | उदय अनंत देसाई | रु. | १०००/- |
| ११५५ | अंबरीश गोरे | रु. | ५००/- |
| ११५६ | सिद्धार्थ कुळकर्णी | रु. | ५००/- |
| ११५७ | कै.आनंद चिदंबर वैद्य स्मरणार्थ जयंत गोविंद वैद्य | रु. | १०००/- |
| ११६३ | सौ. शोभा सूर्यकांत सुर्वे | रु. | २०११/- |
| ११६५ | ऋषिकेश साठे | रु. | ५००/- |
| ११६७ | गिरिधर सदाशिव गाडगीळ | रु. | ५०१/- |
| ११६८ | प्रबोधन प्रकाश देसाई | रु. | १०००/- |
| ११८० | मनोहर जगन्नाथ गोरे | रु. | ५०१/- |
| १००१ | सूर्यकांत कृष्णाजी परांजपे | रु. | ११००/- |
| १००३ | साहिल ट्रेडर्स श्री. लांजेकर | रु. | ५००१/- |
| १०१० | प्रमोद प्रकाश हिंदळेकर | रु. | १००१/- |
| १०१२ | दिनकर वासुदेव देसाई | रु. | १५००/- |
| १०१४ | प्रदीप गोपाळ देवधर | रु. | ३००३/- |
| १०१७ | राजापूर अर्बन को-ऑप बँक | रु. | १००००/- |
| १०१८ | नारायणी एंटरप्रायझेस | रु. | ११०००/- |
| १०१९ | कै.धोंडू बाबू पावसकर स्मरणार्थ प्रकाश धोंडू पावसकर | रु. | ५११/- |
| १०२० | राहुल प्रकाश पावसकर | रु. | ५०१/- |
| १०२१ | चैतन्य विलास देसाई | रु. | ५००/- |
| १०२२ | मधुकर लक्ष्मण मेहेंदळे | रु. | ५००/- |
| १०२३ | प्रभाकर रामचंद्र आंबेलकर | रु. | ५००/- |
| १०२४ | कै. सुषमा पेंडसे स्मरणार्थ शं. रा. पेंडसे | रु. | ५००/- |
| १०२८ | | रु. | ५०५/- |

Scanned by CamScanner

| पावती क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| १०३१ | | रु. ५०१/- |
| १०३२ | | रु. १३५०/- |
| १०३३ | | रु. १०००/- |
| १०३४ | | रु. ५०१/- |
| १०३५ | मेघ:शाम यशवंत नेने | रु. १००१/- |
| १०३७ | मोहीत मोहन गोखले | रु. ५००/- |
| १०३८ | | रु. ५००/- |
| १०३९ | चैतन्य विलास देसाई | रु. ५००/- |
| १०४० | शामसुंदर पर्शराम नार्वेकर | रु. ११२५/- |
| १०४१ | विजय वसंत परांजपे | रु. ५००/- |
| १०४२ | अशोक काळे | रु. १००१/- |
| १०४३ | | रु. ५०१/- |
| १०४५ | विवेक व्ही. जोशी | रु. ५००/- |
| १०४६ | | रु. १००१/- |
| १०४७ | रमेश काजवे | रु. ३००००/- |
| १०४८ | अनिल जैतापकर | रु. ११११/- |
| १०४९ | सुप्रिया चेऊलकर | रु. १००१/- |
| १०५० | आरती काळे | रु. ५००/- |
| ७०३ | ॲड्. अरविंद बी. ढमढेरे | रु. ५००००/- |

## २०१७-१८ वस्तुरूप देणगी

| पावती क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २४९ | मालती हरी लवाटे<br>चांदीचे निरांजन | रु. १५००/- |
| १०२७ | रामकृष्ण भुस्कुटे, गोवा<br>सिलिंग फॅन | रु. २०७०/- |
| | एकूण | रु. ३५७०/- |

## पालखी सजावट देणगी

| पावती क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| १००५ | श्रीधर बाबू पावसकर<br>पालखी सजावट कापड | रु. ५५०/- |
| | एकूण | रु. ५५०/- |

## उत्सव साहित्य

- श्री.जयंत शंकर जोशी व कुटुंबियांकडून खडीसाखर प्रसादासाठी रु. ४००/-
- कै. माई राजोपाध्ये ( रतनताई ) यांचे स्मरणार्थ श्री. राजोपाध्ये यांचेकडून देवाच्या समाराधनेसाठी २५० किलो तांदूळ (अंदाजे किंमत रु. १५ हजार) पुरविण्यात आला.

## २०१७-१८ सुवर्णकळस निधी

| पावती क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| ११३ | काशिनाथ धोंडू हुंबार्डेकर | रु. २५५१/- |
| १००६ | श्रीधर संभाजी चेऊलकर | रु. २५०००/- |
| १००८ | सतिश रघुनाथ देसाई | रु. १००००/- |
| १०२६ | कै. वृंदा रघुनाथ देसाई स्मरणार्थ<br>सतीश र. देसाई | रु. १००००/- |
| ७०१ | कै. प्रकाश सखाराम गवाणकर यांचे स्मरणार्थ<br>ओंकार प्रकाश गवाणकर | रु. २१००/- |
| ७०२ | प्रकाश काजवे | रु.१०११०१/- |
| | एकूण | रु.१५०७५२/- |

Scanned by CamScanner

# • अभिनंदन... •

मार्च २०१८ मध्ये झालेल्या दहावी शालान्त परीक्षेमध्ये कु. अनघा मंगेश काजवे हिने ९५.४०% गुण मिळवून साने गुरुजी विद्यामंदिर, जानशी शाळेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला तर कु. सविता सदानंद लिंगायत हिने ९०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. दोनही मुलींच्या उत्तुंग यशाबद्दल त्यांना रोख पारितोषिक व शिष्यवृत्ती मानधन देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी त्यांचा सत्कार करण्याचे नियोजन करणेत आले आहे.

Scanned by CamScanner

● दिवंगत व्यक्तींबद्दल सहवेदना...

● "ठन गई ! मौत से ठन गई !
मौत की उमर क्या है ? दो पल भी नहीं,
जिंदगी सिलसिला, आज कल की नहीं।
मैं जी भर जिया, मैं मन से मरूँ,
लौटकर आऊंगा, कूच से क्यों डरूँ? "

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न
स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांना
भावपूर्ण श्रद्धांजली....

● ● ●

● देवस्थानच्या ढोल पथकामध्ये अलिकडेच सहभाग नोंदविणारा कु. प्रशांत प्रमोद शिंदे अल्पशा आजारामुळे स्वर्गवासी झाला. केवळ १७/१८ वर्षाचा मुलगा अचानक निघून गेल्याचे दुःख आहे. परमेश्वर त्याच्या आत्म्यास शांती देवो ...

● ● ●

## आभाराचे दोन शब्द ....

देवस्थानचे दैनंदिन काम पहात असताना व उत्सव काळात अनेकांचे उदंड सहकार्य लाभते. या सहकार्यामुळेच आम्हालाही काम करताना उत्साह येतो व मानसिक बळ मिळते. यामध्ये श्री. दत्ताराम जगन्नाथ पाटणकर,

Scanned by CamScanner

श्री. नरेश विठ्ठल कांबळी, श्री. रमेश भगवान काजवे, श्री. विलास मेस्त्री, श्री. सुरेश मेस्त्री, श्री. सचिन मेस्त्री, श्री. बापू मेस्त्री, श्री. संतोष लिंगायत, श्री. भागवत राऊत, श्री. विजय लिंगायत,श्री. आदेश सागवेकर, श्री. सुनील काजवे, श्री. सचिन कांबळी, श्री. देविदास रायकर व कांचनवाडी वाद्यवृंद, श्री. गिरीश धनावडे, श्री. गजानन भोगले, श्री. विश्वनाथ कांबळी, श्री. परमार (भावजी), श्री. गोपी उन्हाळेकर, श्री. प्रदीप चेऊलकर, श्री. मन्सूर खान, श्री. सय्यद मीर, यांचे सहकार्य सातत्याने मिळत असते. श्री. वसंत मोहितेंसारखे देवाचे प्रमुख सेवेकरी दोन्ही उत्सव, होळीचा उत्सव, नवरात्री उत्सव यामध्ये प्रतिवर्षी अव्याहतपणे उपस्थित राहून देवाचे नेमून दिलेले कामकाज पार पाडतात. त्यामुळे त्यांचा उल्लेख या ठिकाणी करणे संयुक्तिक आहे. त्यांची उपस्थिती आभार मानण्यास पात्र आहे. देवाच्या समाराधनेचा भोजन प्रसाद आज अनेक वर्षे श्री. दीपक नाटेकर हे करतात, त्यामुळे त्यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. देवस्थानचे ऑडिटचे काम आज अनेक वर्षे निरपेक्ष भावनेने श्री. निलेश पाटणकर (सी.ए.) राजापूर यांच्याकडून होत आहे. तसेच श्री. दत्ताभाऊ रानडे हे देवस्थानच्या जमा खर्चाचे लिखाण करतात. त्यामुळे यांचे आभार मानणे हे आमचे कर्तव्य समजतो. श्री. श्यामकांत लिंगायत, श्री. विजय गवाणकर, श्री. श्यामसुंदर महांकाळ, श्री. भालचंद्र चेऊलकर, श्री. अरुण जोशी, श्री. दिगंबर गोखले ही सर्व मंडळी यात्रेच्या दिवशी देवस्थानचे ऑफिस सांभाळतात. त्यामुळे या जोखिमेच्या कामाबद्दल त्यांचा नामोल्लेख करणे व त्यांना धन्यवाद देणे आवश्यक वाटते. धार्मिक कामकाजात श्री. नचिकेत देसाई, श्री. श्रीधर देसाई यांची साथ मिळत आहे तर विश्वस्त श्री. रविकांत लिंगायत व विश्वस्त श्री. मनोहर लिंगायत यांचे सहकार्य सदैव मिळत आहे. निवासी व्यवस्था व परिसर स्वच्छतेसाठी श्री. सदानंद तुकाराम लिंगायत व सौ. स्मिता सदानंद लिंगायत यांचे आभार मानले नाहीत तर आभाराचे हे दोन शब्द अधुरे होतील म्हणून त्या दोहोंचे आभार विशेषकरून मानत आहे. अनेक भक्तवर्गाचे, लहान लहान मुलांचे सहकार्य वेळोवेळी लाभते, त्यामुळे या सर्वांचे आभार या निमित्ताने मानावेसे वाटतात.

Scanned by CamScanner






Scanned by CamScanner




बुक-पोस्ट

प्रति,
श्री./सौ./श्रीमती

If undelivered please return to-

प्रेषक : विश्वस्त, श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी - ४१६ ७०२
मोबा. ९२८४३८८७३१ / ९८२३२७७३२६ / ७०३८७८५००१

Scanned by CamScanner